



**रयत शिक्षण संस्थेचे,**

# डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली)

## इतिहास विभाग २०२३-२४

## पोस्टर प्रदर्शन अहवाल

**दिनांक: १७ ऑक्टोबर २०२३**

सन २०२३-२०२४ या शैक्षणिक वर्षात डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली), येथील महाविद्यालयात १७ ऑक्टोबर २०२३ रोजी पोस्टर प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहूणे म्हणून आमच्या महाविद्यालयाच्या प्र. प्राचार्या डॉ. यु. व्ही. पाटील उपस्थित होत्या. पोस्टर प्रदर्शनामध्ये आमच्या इतिहास विभागातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतलेला होता. बी.ए. भाग ३ व एम.ए. भाग १ व २ मधील विद्यार्थ्यांनी पोस्टर प्रदर्शनामध्ये विविध विषय घेऊन पोस्टर प्रदर्शन केले. या पोस्टर प्रदर्शनामध्ये प्रतापगड, स्वराज्याची राजधानी रायगड, छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान शिवनेरी किल्ला, शनिवारवाडा-पेशव्यांचे निवासस्थान, जंजिरा किल्ला असे विषय घेऊन विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. यामध्ये कु. सविता ढेरे, श्री. सारंग गायकवाड, श्री. विजय माने, श्री. उदय सावत, श्री. निशांत दाहिंजे, श्री. मनोज सावत या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

पोस्टर प्रदर्शनामध्ये प्रमुख पाहुणे प्र. प्राचार्या डॉ. यु. व्ही. पाटील यांनी विद्यार्थ्यांना अतिशय चांगल्या पद्धतीने मार्गदर्शन करून प्रोत्साहित केले, तर पोस्टर प्रदर्शनामधील पोस्टरचे परीक्षण प्रा. डॉ. एन. एच. कुंभार यांनी केले. या कार्यक्रमासाठी प्र. प्राचार्या डॉ. यु. व्ही. पाटील यांनी सर्व विद्यार्थ्यांना , सहकाऱ्यांना चांगल्या प्रकारे मार्गदर्शन व सहकार्य केले. तसेच इतिहास विभाग प्रमुख डॉ. आर. आर. सोनावले व सहकारी डॉ. व्ही. पी. पवार, प्रा. बी. एस. कुंभार, प्रा. वाय. पी. कांबळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व सहकार्य केले. एकंदरीत पोस्टर प्रदर्शन हा कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला.

निष्पत्ती– पोस्टर प्रदर्शनाचे महत्व समजले .
पोस्टर प्रदर्शनाचा उद्देश समजला .

लाभार्थी- ५ विदयार्थी सहभागी झाले होते .



इतिहास विभागातील विद्यार्थी पोस्टर प्रदर्शन करताना व प्रा. डॉ. एन. एच. कुंभार परीक्षण करताना .



इतिहास विभागातील प्रा. डॉ. व्ही. पी. पवार, प्रा. डॉ. ए. एस. खाडे, प्रा. बी. एस. कुंभार, प्रा. वाय. पी. कांबळे आणि विद्यार्थी.

प्रमुख
इतिहास विभाग

प्र. प्राचार्या
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली)